**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक २६ जून २०२६**

**ठळक बातम्या**

1. **महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकाच्या मसुद्याला राज्य मत्रिमंडळाची मंजुरी; नागपूर मेट्रोच्या कन्हान पर्यंत विस्ताराला देखील मान्यता.**
2. **अंमली पदार्थांचा विळखा हा तरुण पिढी तसंच देशाच्या भविष्यासाठी धोकादायक असल्याचं गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन.**
3. **शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची उद्या यवतमाळ मध्ये जाहीर सभा.**
4. **देशभरात २९ जून ते ६ जुलै या कालावधीत 'सहकार सप्ताहा'चं आयोजन.**
5. **वर्धा, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात मध्यम ते तीव्र स्वरूपाच्या पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी.**

**आता सविस्तर बातम्या .......**

मंत्रिमंडळ निर्णय

शेतकरी कल्याण योजनांचा लाभ जमीन कसणाऱ्या महिला शेतकऱ्यांनाही घेता यावा याकरता महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकाच्या मसुद्याला राज्य मत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. जमीन कोणाच्याही नावावर असली तरी ती कसणाऱ्या महिलांना शेतकऱ्यांसाठीच्या सरकारी योजना आणि अनुदानाचा लाभ घेता येईल. अशा महिलांना महिला शेतकरी प्रमाणपत्र जारी करण्याचा प्रस्ताव विधेयकात आहे. त्यात ग्रामसभा आणि नागरी स्वराज्य संस्थांचा सहभाग असेल. हे विधेयक विधिमंडळाच्या चालू अधिवेशनात मांडण्यात येणार आहे. नागपूर मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यात कन्हान गावापर्यंत सुमारे दीड किलोमीटरचा उन्नत मार्ग बांधण्याच्या प्रस्तावाला कालच्या बैठकीत मंजुरी मिळाली. या कामावर ३१० कोटी ३५ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

अंमली पदार्थविरोधी दिन

आज अमली पदार्थ विरोधी दिन पाळण्यात येत आहे. अंमली पदार्थांच्या व्यसनाचं आव्हान साऱ्या जगाला भेडसावत असून भारताने त्याविरुद्ध जोरदार लढा उभारल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. ते आज नवी दिल्लीत नार्को कोऑर्डिनेशन सेंटरच्या दहाव्या बैठकीला संबोधित करत होते. अंमली पदार्थांचा विळखा हा राष्ट्रीय सुरक्षा, सामाजिक स्थैर्य, आर्थिक हितसंबंध आणि तरुण पिढी तसंच देशाच्या भविष्यासाठी धोकादायक असल्याचंही शहा यांनी यावेळी नमूद केलं.

आफ्टर पार्टी

अमली पदार्थांच्या व्यसनाविरोधात जनजागृती करणाऱ्या *'आफ्टर पार्टी'* या चित्रपटाचा ट्रेलर आणि पोस्टरचे नागपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महापौर नीता ठाकरे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आलं. जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सुमारे २०० नागरिकांच्या उपस्थितीत चित्रपटाचा विशेष प्रीमियरही पार पडला. महाराष्ट्र पोलीस आणि दिव्यम स्टुडिओज यांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आलेला हा चित्रपट युवकांमध्ये नशाविरोधी जनजागृती करण्याचा संदेश देतो. याशिवाय जागतिक अंमली पदार्थविरोधी दिनानिमित्त गडचिरोली पोलिसांनी 'ड्रग फ्री गडचिरोली' मॅरेथॉनचं आयोजन केलं . या मॅरेथॉनमध्ये ५०० हून अधिक पोलिस अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. समारोपावेळी पोलिस अधीक्षक एम. रमेश यांनी व्यसनमुक्त समाजासाठी जनजागृती आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांचं महत्त्व अधोरेखित केलं .

उद्धव ठाकरे

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आज रात्री यवतमाळ इथं दाखल होणार असून, ते उद्या सकाळी 11 वाजता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शेडमध्ये जाहीर सभा घेणार आहेत. यवतमाळ-वाशिमचे खासदार संजय देशमुख यांनी शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर ठाकरे यांचा हा पहिलाच दौरा आहे. त्यांच्या सोबत आदित्य ठाकरे, संजय राऊत, अरविंद सावंत आणि मिलिंद नार्वेकर उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, पालकमंत्री संजय राठोड यांनी ठाकरे यांच्या दौऱ्यावर प्रतिक्रिया देताना, "आम्ही टीकेला कामाने उत्तर देतो," असा टोला लगावला.

## संयुक्त पूर्व परीक्षा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ ची जाहिरात प्रसिद्ध केली आहे. दोन हजार ६१९ पदांची भरती यातून केली जाणार आहे. इच्छुक आणि पात्र उमेदवारांना उद्यापासून १७ जुलैपर्यंत संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करता येतील. नागरी सेवा मुख्य परीक्षेतील वैकल्पिक विषय वगळण्याचा निर्णय तसेच पूर्व परीक्षा वर्षातून दोन ते तीन वेळा घेऊन मुख्य परीक्षेसाठी पात्र होण्याच्या संधी उपलब्ध करून देण्यासंबंधीचं पत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलं आहे.

## मोहरम

देशभरात आज मोहरम पाळला जात आहे. प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचे नातू हजरत इमाम हुसेन आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या हौतात्म्याचं स्मरण करून देणारा हा दिवस आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोहरम निमित्त दिलेल्या संदेशात म्हटलंय की, हजरत इमाम हुसेन यांचं कार्य सत्य आणि न्यायाप्रति वचनबद्ध राहण्याची प्रेरणा देत राहील. मोहरम निमित्ताने ठिकठिकाणी 'ताझिया' मिरवणुका काढल्या जाणार आहेत. त्या दृष्टीनं वाहतुकीचं नियमन आणि सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

## दीक्षा भूमी

स्मारक समिती, दीक्षाभूमी संदर्भात खोटी आणि दीशाभूल करणारी माहिती सार्वजनिकरित्या सांगणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांनी प्रसिध्दी पत्रकामार्फत प्रसार माध्यमांना दिली. दीक्षाभूमीचे व्यवस्थापन बेकायदेशीररित्या ताब्यात घेण्याचा हा प्रयत्न असल्याची टीकाही त्यांनी केली. या कृतीमुळे समाजात चुकीचा संदेश पसरला असून धम्म बांधवात रोष निर्माण होत असल्याचं ससाई यांनी सांगितलं. दरम्यान मिशन बहुजनच्या वतीने उद्या दुपारी २ वाजता. सिव्हिल लाईन्स येथील रविभवन येथे "मुक्त परिषद" आयोजित करण्यात आली आहे. दीक्षाभूमीच्या विकासासंदर्भात व्यापक चर्चा घडवून आणणे, लोकशाही पद्धतीने व्यवस्थापन अधिक सक्षम करणे आणि सर्व समाजघटकांचा सहभाग वाढविणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

'सहकार सप्ताह'

केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या स्थापनेला ५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या औचित्यावर भारत सरकारच्या सूचनेनुसार देशभरात २९ जून ते ६ जुलै या कालावधीत 'सहकार सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. महाराष्ट्रात हा सप्ताह अत्यंत व्यापक स्तरावर आणि लोकसहभागातून साजरा करण्यासाठी सहकार आयुक्तालय आणि राज्यातील प्रमुख सहकारी महासंघांनी जय्यत तयारी केली आहे. महाराष्ट्र राज्यातील सहकारी बँका, पतसंस्था, गृहनिर्माण संस्था, कृषी संस्था, प्रक्रिया संस्था, ग्राहक संस्था, महिला आणि युवक सहकारी संस्था तसेच सर्व जिल्हा आणि तालुका स्तरावरील सहकारी संघटनांनी या सप्ताहात सक्रिय सहभाग नोंदवावा असं आवाहन करण्यात आलं आहे.

राजर्षी शाहू स्मारक

राजर्षी शाहू महाराज यांची आज जयंती साजरी करण्यात येत आहे. छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त आज पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा सभापती ओम बिर्ला आणि केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांच्यासह अनेक नेत्यांनी त्यांना आदरांजली वाहिली. शाहू महाराज सामाजिक न्याय आणि समतेचे खंदे पुरस्कर्ते होते. त्यांचे महान कार्य आणि आदर्श राष्ट्राला प्रेरणा देत आणि मार्गदर्शन करत राहील, अशा शब्दांत त्यांनी समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये आदरांजली वाहिली. शाहू महाराजांचं सामाजिक सुधारणेतील योगदान अमूल्य असल्याचं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या संदेशात केलं आहे. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी मुंबईतल्या महाराष्ट्र लोकभवन इथे शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातल्या सारथी म्हणजेच छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्थेच्या मुख्यालयाला भेट देऊन तिथल्या उपक्रमांची माहिती घेतली. सारथीने शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात येईल, असं फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कोल्हापूरमध्ये दसरा चौक इथल्या राजर्षी शाहू छत्रपती स्मारक भवनाचं लोकार्पण जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर आणि खासदार श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हस्ते करण्यात आले. तसंच जिल्हा प्रशासनाच्या वतीनं समता दिंडीही काढण्यात आली.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात राजर्षी छत्रपती शाहू महाराज

जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनात झालेल्या कार्यक्रमाला विद्यापीठाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

आमदार सुधीर मुनगंटीवार

आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेतील अर्धा तास चर्चेत चंद्रपूर जिल्ह्यातील मोरवा येथे आधुनिक व्यावसायिक विमानतळ उभारण्याचा मुद्दा मांडला. विद्यमान धावपट्टीचा विस्तार करून ती १८०० मीटरपर्यंत वाढविणे, आवश्यक जमीन अधिग्रहित करून सर्व अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज नवीन विमानतळ उभारणे आणि चंद्रपूरला व्यावसायिक विमानसेवेच्या नकाशावर आणणे ही काळाची गरज असल्याच त्यांनी यावेळी सांगितलं.  यावर  मंत्री आशिष शेलार यांनी या प्रकल्पाबाबत सकारात्मक भूमिका घेत, मोरवा विमानतळाच्या उभारणीसाठी आवश्यक सर्व प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याची ग्वाही सभागृहात दिली.

खरीप पेरणी

बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यासह सुनगाव परिसरात पेरणीयोग्य पाऊस झाल्याने खरीप पेरणीला वेग आला आहे. अनेक शेतकऱ्यांनी पारंपरिक बैलजोडी आणि तिफणाच्या साहाय्याने सोयाबीन आणि तुरीच्या आंतरपिकाची पेरणी सुरू केली आहे. अल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे कमी पावसाची शक्यता लक्षात घेऊन कृषी विभागाने शेतकऱ्यांना आंतरपीक पद्धती, कमी कालावधीच्या वाणांचा वापर, बीजप्रक्रिया आणि संतुलित खत व्यवस्थापनाचा अवलंब करण्याचं आवाहन केलं आहे. यंदा जिल्ह्यात ७ पूर्णांक ३९ लाख हेक्टरवर खरीप लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे.

हवामान

आज वर्धा, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात मध्यम ते तीव्र स्वरूपाच्या पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.  तर उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये हलक्या पावसासह वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.  उद्या अमरावती, अकोला, वाशीम आणि बुलढाणा वगळता हा येलो अलर्ट कायम राहणार आहे. दरम्यान, नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने जारी केलेल्या सूचनेनुसार आज संध्याकाळच्या सुमारास नागपूर शहरात मध्यम स्वरूपाच्या सरींनी दखल

दिली. या पावसामुळे उकाड्यापासून किंचित दिलासा मिळाला आहे. याशिवाय आगामी काही तासात नागपूरसह भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, अमरावती, बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये देखील मेघगर्जनेसह वादळी वारा आणि हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

****